# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

मध्यवर्ती कार्यालय : 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा-४१५००१.
☎: (०२१६२) २२०६५९, ■ Visit our Website : www.antisuperstition.org ■

कार्यालय : 'भास्कर' ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१०,८९७५१३०६०९ **Email :** avinashpatilmans@gmail.com

**जा.क्र :** MANS/2016-17/006 **दिनांक :** 24 नोव्हेंबर 2016

प्रिय साथी,

राज्य पदाधिकारी,
जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव
शाखा कार्याध्यक्ष व शाखा प्रधान सचिव

यावर्षी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती महोत्सवानिमित्त भारतीय संविधानाचा विचार जनमानसात पोहचविण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सर्व शाखानिहाय संविधान दिन ( 26 नोव्हेंबर 2016) ते प्रजासत्ताक दिन ( 26 जानेवारी 2017 ) या कालावधीत **'संविधान बांधिलकी महोत्सव'** विविध उपक्रमांनी साजरा करण्याचे ठरविले आहे.

त्यासाठी आवश्यक ते प्रचार साहित्य एस टी पार्सल ने जिल्हा कार्याध्यक्षांच्या नावे पाठविले आहे. त्यात संविधानाचे अंतरंग पुस्तिका, संविधान प्रास्तविका, संविधान प्रास्तविका कॅलेंडर, पोस्टर्स, स्टिकर्स, फोटो व त्या मागे संविधान (पॉकेट साईज), बॅचेस, तीन रंगात पताका हे सर्व साहित्य आहे.

01. हे सर्व प्रचार साहित्य जिल्हा कार्याध्यक्षाने सर्व शाखांना सम प्रमाणात वाटप करावे. त्यातील संविधानाचे अंतरंग पुस्तिका, संविधान प्रास्तविका, संविधान प्रास्तविका कॅलेंडर, स्टिकर्स विक्री करावयाचे असून मिळणारे सर्व पैसे शाखांनी ठेवायचे आहे. मात्र त्याबाबतचा तपशील मध्यावर्तीला कळवायचा आहे.
02. 26 नोव्हेंबर रोजी सर्व शाखांतील कार्यकर्त्यांनी आपल्या शाखा किंवा जिल्ह्याच्या शहराच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याजवळ जमावे. तेथे त्या पताका लावाव्यात जागोजागी पोस्टर्स लावावेत व डॉ. बाबासाहेबांना अभिवादन सभा घ्यावी.
03. त्यावेळी संविधान प्रस्ताविकेचे वाचन करावे, घोषणा द्याव्या, संविधानाचा पोवाडा सादर करावा.
04. दोन महिन्यात राबविल्या जाणाऱ्या संविधान बांधिलकी महोत्सवाचा उद्घाटन कार्यक्रम घ्यावा.
05. पाहुण्यांच्या व्याख्यानाचा विषय निश्चिती करून घ्यावी. शक्यतो (1) संविधानाचे महत्व, व पास्ताविकेचा मूल्य आशय, (2) नागरिकांचे हक्क, मर्यादा आणि कर्त्यव्य, (3) संविधानासाठी डॉ. बाबासाहेबांचे योगदान अशी मांडणी असावी.

06. समविचारी संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये यांना सोबत घेऊन संविधान प्रबोधन फेरीचे आयोजन करावे. त्यावेळी शक्य झाल्यास संविधान मशाल तेवत ठेवावी.

07. शाळा, महाविद्यालय, बाजार पट्टी, सार्वजनिक चौक, वर्दळीच्या ठिकाणी 'संविधान चालता बोलत' कार्यक्रम घ्यावा.

08. भारतीय संविधानाचे अंतर्रंग या पुस्तकाचे ठरवून वाचन करून घ्यावे.

09. ज्या ज्या भागात निवडणुकांचे वातावरण असेल अशा ठिकाणी संविधानाच्या अंगाने 'मतदार जागृती कार्यक्रम' घ्यावेत.

10. ज्यांना शक्य आहे त्यांनी संविधानावर पथनाट्य किंवा रिंगण नाट्य करावे.

11. संविधान संवाद सभा, संविधान सांस्कृतिक अभिव्यक्ती, संविधान संकल्प सहचिंतन, 26 जानेवारी रोजी ध्वजारोहण असे कार्यक्रम घ्यावेत.

12. सर्व कार्यक्रम घेण्याअगोदर व नंतर पुरेशी प्रसिध्दी द्यावी. त्याचबरोबर त्या दोन महिन्यात घेण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांच्या नोंदी ठेवाव्यात. त्याबाबतचे पेपर कात्रण व रिपोर्टिंग सुशीला मुंडे (मो.:09404870435, इमेल: sushilamunde1@gmail.com) आणि सुनील स्वामी (मो.9881590050, इमेल: sunilswamiich@gmail.com) यांच्याकडे ईमेलने पाठवावे.

आपला स्नेहांकित,



**अविनाश पाटील**

राज्य कार्याध्यक्ष